**ठळक बातम्या**

- पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी राज्य सरकारकडून ३१ हजार ६२८ कोटींच्या पॅकेजची घोषणा

- कुणबी मराठ्यांना ओबीसी प्रमाणपत्र देण्याच्या शासन निर्णयाला स्थगिती द्यायला उच्च न्यायालयाचा नकार

- भुसावळ-वर्धा आणि गोंदिया-डोंगरगड दरम्यान अतिरीक्त रेल्वे मार्गिका टाकायला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी

**आणि**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या नवी मुंबई विमानतळ, मेट्रो ३ चा अखेरचा टप्पा, आणि मुंबई १ ॲपचं लोकार्पण

**<><><><>**

राज्यात पूरामुळं झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून राज्य सरकारनं ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचं पॅकेज शेतकऱ्यांसाठी जाहीर केलं आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत याला मंजुरी मिळाली. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून..

**होल्ड कॅप्सूल**

*(राज्यातल्या एकंदर ६८ लाख ६९ हजार ७५३ हेक्टरवरच्या पिकाचं या पावसामुळं नुकसान झालं असून २९ जिल्ह्यांमधल्या २५३ तालुक्यांतल्या २ हजार ५९ मंडळांतल्या शेतकऱ्यांना राज्य सरकार नुकसान भरपाई देणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी मंत्रालयात वार्ताहर परिषदेत जाहीर केलं. यापैकी जास्तीत जास्त नुकसान भरपाई दिवाळीच्या आधी देण्याचा प्रयत्न करू, असं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलं.*

**- *- होल्ड... बाईट- देवेंद्र फडनवीस - -***

*विहिरी, पायाभूत सुविधा पुन्हा उभारण्यासाठी, तसंच घरं, दुकानं, गोठे, जनावरांचं नुकसान झालेल्यांनाही अर्थसहाय्य देणार असल्याचं फडनवीस यांनी सांगितलं. तसंच, खरडून*

*गेलेल्या जमिनीसाठी ४७ हजार रुपये प्रति हेक्टर रोख नुकसान भरपाई, तर ३ लाख रुपये प्रति हेक्टर इतकी भरपाई मनरेगाच्या माध्यमातून देऊ, अशी माहितीही त्यांनी दिली. दुष्काळाच्या तरतुदी इथंही लागू करून त्यानुसार कार्यवाही करू, असा पुनरुच्चार फडनवीस यांनी केला.)*

**<><><><>**

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या इतर निर्णयांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून..

**व्हाइस कास्ट मंत्रीमंडळ२**

*(राज्याच्या सर्व महापालिका, नगरपालिका, नगरपंचायती आणि नगरपरिषदेतल्या सांडपाण्यावर प्रक्रिया करायच्या धोरणाला राज्य मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली. राज्यभरातल्या ४२४ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये हे धोरण राबवलं जाईल. महाराष्ट्र रत्नं आणि दागिने धोरण २०२५ सुद्धा या बैठकीत मंजूर झालं. सोनं, चांदीचे दागिने, हिरे, रत्नं यांच्याशी निगडीत उद्योग-व्यवसाय वाढीला चालना मिळणार आहे. या क्षेत्रात एक लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून पाच लाख नवीन रोजगार निर्मितीचं उद्दिष्ट ठेवलं आहे. तुकडे बंदी अधिनियमाबद्दलच्या १९४७च्या अधिनियमात सुधारणा करायला राज्य मंत्रिमंडळानं मान्यता दिली. सहकारी सूतगिरण्यांना प्रति युनिट ३ रुपये वीज अनुदान सवलत लागू करायलाही राज्य सरकारनं आज मान्यता दिली. स्वयंसेवी संस्थांद्वारे चालवण्यात विजा भज प्रवर्गातल्या विविध आश्रमशाळांमधल्या सुमारे 1 हजार शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनाही राज्य मंत्रीमंडळानं आज मंजूर केली.)*

**<><><><>**

सरकारने जाहीर केलेली मदत अत्यंत तुटपुंजी असल्याचं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे. सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी, खरडून गेलेल्या जमिनीसाठी हेक्टरी ५ लाख रुपये द्यावेत तसंच कर्जमाफी करावी अशी मागणी सपकाळ यांनी केली.

अतिवृष्टीग्रस्तांसाठी राज्य सरकारने केवळ ६ हजार ५०० कोटी रुपये इतकीच मदत दिली असून बाकीचे पैसे वेगवेगळ्या योजनांचा भाग आहेत, त्यांचा समावेश पॅकेजमधे करून

सरकारने चलाखी केल्याची टीका किसान सभेचे राज्य सचिव डॉक्टर अजित नवले यांनी केली आहे.

**<><><>**

कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा नोंदी असलेल्यांना ओबीसी प्रमाणपत्र देण्याच्या शासन निर्णयाला स्थगिती द्यायला मुंबई उच्च न्यायालयानं आज नकार दिला. या शासन निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर राज्याच्या सामाजिक न्याय विभागानं उत्तर द्यावं, असे आदेश मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठानं दिले. गेल्या २ सप्टेंबर रोजी हा शासन निर्णय जारी झाला होता.

**<><><>**

भुसावळ - वर्धा, गोंदिया-डोंगरगड यासह एकूण ८९४ किलोमीटरच्या रेल्वे मार्गिकांच्या विकासाला केंद्रीय मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली. यासाठी एकूण २४ हजार ६३४ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे, अशी माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

भुसावळ आणि वर्धा दरम्यानच्या ३१४ किलोमीटरच्या रेल्वे मार्गावरच्या तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकेला, तसंच गोंदिया - डोंगरागड या ८४ किलोमीटरच्या रेल्वे मार्गावरच्या चौथ्या मार्गिकेला यात मंजुरी मिळाली आहे.

**<><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून दोन दिवस मुंबई दौऱ्यावर येत आहेत. याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - -होल्ड व्हाइस कास्ट - -**

*(प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन होईल. डिसेंबरपासून या विमानतळावरुन उड्डाणांना सुरुवात होईल. मुंबई मेट्रो-३ चा आचार्य अत्रे मार्ग ते कफ परेड दरम्यानचा अखेरचा टप्प्यातल्या मेट्रो सेवेलाही प्रधानमंत्री हिरवा झेंडा दाखवतील. यामुळं आरे कॉलनी, बीकेसी, सीएसएमटी, चर्चगेट, मंत्रालय, विधानभवन मेट्रो मार्गिकेनं जोडले जाणार आहेत.*

*लोकल, मुंबई महानगर परिसरातल्या सर्व मेट्रो, मोनो, बेस्ट तसंच मुंबई महानगर क्षेत्रातल्या सर्व महापालिका क्षेत्रातल्या बस सेवेचं तिकिट एकाच ॲप वरुन काढता येणाऱ्या मुंबई वन ॲपचं लोकार्पणही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होईल. विविध मेट्रो, बस, लोकल वगैरेंनी*

*टप्प्याटप्प्याने नागरिकांना प्रवास करायचा असला तरी या सर्व प्रवासासाठी स्वतंत्र तिकिटाऐवजी एकच तिकीट या ॲपद्वारे काढता येईल. आयटीआय आणि तंत्रनिकेतन मधल्या लघु कालीन अभ्यासक्रमांनाही प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत सुरुवात होईल.)*

**<><><><>**

ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर उद्यापासून २ दिवसीय मुंबई दौऱ्यावर येत आहेत. स्टार्मर यांची ही पहिलीच भारत भेट आहे. ९ ऑक्टोबर रोजी स्टार्मर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची मुंबईत भेट घेतील आणि भारत-ब्रिटन द्विपक्षीय संबंधाचा आढावा घेतील. यावेळी दोन्ही नेते विविध उद्योगांच्या प्रमुखांशीही चर्चा करणार आहेत. तसंच प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर चर्चा करणार आहेत.

**<><><><>**

लाभार्थ्यांना थेट मदत हस्तांतरित केल्यानं केंद्र सरकारची गेल्या ११ वर्षात ४ लाख ३१ हजार कोटी रुपयांची बचत झाली आणि लाभार्थ्यांची संख्या १६ पटींची वाढल्याची माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज दिली. मुंबईत सुरू झालेल्या ग्लोबल फिनटेक फेस्टच्या उद्घाटन समारंभात त्या बोलत होत्या. गिफ्टसिटीमधले परकीय चलनाचे व्यवहार तत्काळ पूर्ण व्हावे यासाठीच्या नव्या यंत्रणेचं अनावरण त्यांनी केलं. यापूर्वी या व्यवहारांना ३६ ते ५४ तास लागत होते.

ग्राहकांना सुरक्षितरित्या पैसे हस्तांतरित करता यावे यासाठी सेबी आणि एनपीसीआय यांनी वैध युपीआय आणि सेबी चेक सुविधा सुरू केल्याची माहिती त्यांनी दिली. या अंतर्गत म्युच्युअल फंडांच्या युपीआयमध्ये .MF तर शेअर दलालांच्या युपीआयमध्ये .BRK असणार आहे.

**<><><><>**

माध्यम आणि मनोरंजन उद्योगात गेल्या २५ वर्षांत झालेली प्रगती उल्लेखनीय आहे. २५ हजार कोटी रुपयांवरुन हा उद्योग अडीच लाख कोटी रुपयांवर गेला असल्याची माहिती केंद्रीय माहिती प्रसारण सचिव संजय जाजू यांनी दिली. मुंबईत रौप्यमहोत्सवी फिक्की फ्रेम्सचं उद्घाटन करताना ते बोलत होते. जगभरातल्या सिनेरसिकांना भुरळ घालणाऱ्या भारतीय चित्रपटांचा उल्लेख त्यांनी केला.

फिक्की फ्रेम्स आणि मराठी चित्रपटातला संबंध वाढवू असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या परिषदेत दिलं. वेव्ह्ज ओटीटी हा मंच सर्व प्रकारच्या भारतीय कंटेंटसाठी सर्व समावेशक व्यासपीठ आहे, अशी माहिती प्रसार भारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी यांनी दिली.

**<><><><>**

एसटी कामगारांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी सकारात्मक निर्णय घेऊ असं आश्वासन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिलं. वेतनवाढ, महागाई भत्ता आदी मागण्यांसाठी एसटी कामगार संघटना दिवाळीपूर्वी आंदोलन करणार होत्या, त्या पार्श्वभूमीवर आज मंत्रालयात एसटी कामगार संघटनांसोबत बैठक झाली, त्यावेळी सरनाईक बोलत होते. कामगारांचे महागाई भत्ते, घरभाडे भत्ता आणि अन्य थकीत भत्ते, तसेच दिवाळी सण अग्रिम देण्याबाबत शासन सकारात्मक निर्णय घेईल, असं आश्वासन सरनाईक यांनी दिलं.

**<><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><>//**